# नि.दि.दा. क्र. ०४/२०२२
# CNRNOMHOS120000292022
# सुरेखा वि. शासन
# नि.क्र. ५१ खालील आदेश
# (आदेश दि.११/०६/२०२४)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ५, ६, १२ ते १५, २०, २१, २४, २५, २८, २९, ३४, ५५, ५६, ५९, ६०, ६२, ६३, ७३, ७४, ७५, ८० व ८१ यांनी त्याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होऊन त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे काही प्रतिवादी बाहेर गावी गेले होते तर काही प्रतिवादी आजारी होते. त्याचप्रमाणे काही प्रतिवादी अशिक्षीत असल्यामुळे न्यायालयात हजर राहु शकले नाहीत. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादींच्या स्थावर मालमत्तेचे हक्क अधिकार गुंतलेले आहेत. त्यामुळे प्रकरणाचा निकाल गुणदोषांवर होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जास हजकत घेतली आहे की, अर्जात नमुद केलेली कारणे संयुक्तीक नाहीत व त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अथवा अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रत्येक प्रतिवादीकडुन वादीस रक्कम रुपये ५,०००/- इतकी कॉस्ट मिळावी.

३. प्रस्तुत दाव्यामध्ये एकुण ८१ प्रतिवादी आहेत. दाव्यामध्ये ब-याचशा स्थावर मिळकती वाद मिळकत म्हणुन नमुद आहेत. अशा परिस्थीतीत प्रतिवादींना संधी देवून दावा हा गुणदोषांवर चालणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे, प्रस्तुत प्रतिवादी यांनी सदर अर्जासोबत त्यांची कैफियत देखील दाखल केलेली आहे. त्यामुळे जरी अर्जातील कारणे संयुक्तीक नसली तरीही दावा गुणदोषांवर निकाली होण्यासाठी कॉस्टवर मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. सबब, खालील आदेश.

# आदेश

१. निशाणी क्र.५१ खालील अर्ज प्रत्येक प्रतिवादींनी वादीस रक्कम रुपये ५०/- इतकी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत प्रतिवादी यांनी सोसण्याचा आहे.

स्वा/-११.०६.२०२४

दिनांक – ११/०६/२०२४

( अ. प्र. कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, भूम.

# **CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr.A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 11/06/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 11/06/2024 |
| Order uploaded on | --- | 11/06/2024 |